(५)

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई-४०० ०२१
दूरध्वनी क्र. : २२०२६२४९, २२८३५२४७ फॅक्स : २२०२९३४८
ई.मेल पत्ता: mstmjp@rediffmail.com
caomjp@rediffmail.com
वेब पत्ता : mahajeevan.com

जा.क्र.मजीप्रा/सस/आ-४/ १६ मे, २००८

विषय : दिनांक २९ एप्रिल, २००८ रोजी संपन्न झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ११० व्या बैठकीचे इतिवृत्त.

दिनांक २९ एप्रिल, २००८ रोजी दुपारी २.३० वाजता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची ११० वी सभा संपन्न झाली. सदर सभेचे इतिवृत्त मान्यतेसाठी यासोबत सादर करण्यात येत आहे. कृपया सदर इतिवृत्तास मान्यता मिळावी, ही विनंती.

सोबत : इतिवृत्त

(संजय दहासहस्त्र)
सदस्य सचिव

मा.मंत्री,
प्रा.पु.व स्व.
तथा अध्यक्ष, म.जी.प्रा.

पापु -९४०८
२०/५/०८

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ११० व्या सभेचे इतिवृत्त

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची ११० वी सभा मा. मंत्री, जलसंपदा, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा म.जी.प्रा.चे पदसिध्द अध्यक्ष, मा. श्री. अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार दिनांक २९.४.२००८ रोजी संपन्न झाली. या सभेस मजीप्राचे खालील सदस्य उपस्थित होते.

१. मा. श्री.अजित पवार, मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष.
२. श्री. अजित कुमार जैन, प्रधान सचिव, पा.पु. व स्व. विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य.
३. प्रधान सचिव, (वित्त व सुधारणा ) वित्त विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य यांच्या वतीने श्री.शि.म. म्हात्रे, उप सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
४. प्रधान सचिव, (उर्जा ) उद्योग उर्जा कामगार विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य यांच्या वतीने श्री.प्र.ना. मुदखेडकर, उप सचिव, (उर्जा) उर्जा विभाग मंत्रालय, मुंबई-३२
५. सचिव,ग्राम विकास विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य यांच्या वतीने श्री. अविनाश सुभेदार उप सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
६. श्री. संजय दहासहस्त्र, सदस्य सचिव, म.जी.प्रा., मुंबई.

**या व्यतिरिक्त सदर सभेस खालील मजीप्राचे अधिकारी तसेच इतर विभागाचे पदाधिकारी उपस्थित होते.**

१. श्रीमती जयलक्ष्मी चेक्कला, सह सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. श्री. प्र. वा. पांढरीपांडे, वि.स. व मु.ले.अ., म.जी.प्रा., नवी मुंबई.
३. श्री. द. चि. सूर्यवंशी, प्रभारी मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता (समन्वय), म.जी.प्रा., मुंबई.
४. श्री. बा. शि. पाटील, उप-मु.ले.अ., म.जी.प्रा., नवी मुंबई.
५. श्री. सु. पु. भातखंडे, कायदा व कामगार अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी. म.जी.प्रा., मुंबई.

मा. मंत्री, जलसंपदा, पा.पु. व स्व. तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सभेस सुरूवात झाली.

**मा. अध्यक्ष तथा**
**मंत्री, पा.पु. व स्व.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

**कार्यक्रम बाब क्र.१ :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १०९ व्या सभेच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता देणे.

दिनांक १५ जानेवारी, २००८ रोजी संपन्न झालेल्या १०९ व्या सभेच्या इतिवृत्तास सर्वसाधारण चर्चेनंतर मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.२ :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १०९ व्या सभेतील निर्णयावर करण्यांत आलेली कृती.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दिनांक १५ जानेवारी, २००८ रोजी संपन्न झालेल्या १०९ व्या बैठकीचे जे निर्णय घेण्यात आले होते, त्या निर्णयाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत मा. सदस्य सचिव यांनी संचालक मंडळात अवगत करण्यांत आल्यानंतर केलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.३ :** राज्य सार्वजनिक उपक्रमाने तात्पुरता शिल्लक निधी गुंतविण्यासाठी सुधारित मार्गदर्शक तत्वांच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केलेल्या गुंतवणूकीस मान्यता मिळण्याबाबत..

सदर कार्यक्रम वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी बैठकीपुढे विषद केले. यावर चर्चा होऊन कार्यक्रम बाबीमध्ये प्रस्तावित केलेल्या गुंतवणूकीस मान्यता देण्यांत आली.

**ठराव :**

असा ठराव करण्यांत येतो की, दिनांक १.१.२००८ ते ३१.३.२००८ या कालावधीत प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे केलेल्या अल्प व दिर्घ मुदतीच्या गुंतवणुकीस मान्यता देण्यात येत आहे, तसेच मुदतपूर्व काढून घेण्यात आलेल्या गुंतवणुकीसही मान्यता देण्यात येत आहे.

**मा. अध्यक्ष तथा**
**मंत्री, पा.पु. व स्व.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

**कार्यक्रम बाब क्र.४ :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या न्हावा-शेवा प्रकल्प क्षेत्र व प्रकल्प क्षेत्राबाहेरील पाणी पुरवठा केंद्रातून होणाऱ्या पाणी पुरवठयाच्या दराचा सन २००८-०९ साठी आढावा..

प्रस्ताव सादर करतांना सदस्य सचिव यांनी असे नमूद केले की, आढावा घेतल्यानंतर तिन्ही क्षेत्रातील पाणी पुरवठा केंद्रांचा एकत्रित विचार केल्यास पाणी पुरवठा केंद्र चालविण्यामध्ये सन २००८-०९ मध्ये रु. १७.७३ कोटी इतके अधिक्य अपेक्षित असल्याने पाणी पुरवठा दर सुधारित करण्याचे प्रस्तावित नाही. शिवाय वीज दरामध्ये देखील ४०% बचत होणे अपेक्षित असल्याने आणि सध्याचे पाण्याचे दर इतर संस्था जसे एम.आय.डी.सी. इतर महापालिकांपेक्षा जास्त असल्याने यामध्ये आणखीन दरवाढ केल्यास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील मोठी व महत्वाचे ग्राहक इतर पर्यायांचा विचार करण्याची शक्यता असल्याने दरवाढ करण्याचे प्रस्तावित नसल्याचे नमूद केले आहे. यावर प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी असे सूचित केले की, आयुध कारखान्यांना होणाऱ्या पाणी पुरवठयाचे दरात वाढ करु नये. मात्र ज्या पाणी पुरवठा केंद्रामध्ये उत्पादन खर्च एकूण सरासरी खर्चापेक्षा जास्त आहे अशा पाणी पुरवठा केंद्राचा आढावा घेण्यात यावा. यावर चर्चा होऊन पुढील प्रमाणे ठराव संमत झाला.

**ठराव :-**

असा ठराव करण्यात येतो की ज्या पाणी पुरवठा केंद्रामध्ये उत्पादन खर्च एकूण सरासरी खर्चापेक्षा जास्त आहे अशा पाणी पुरवठा केंद्राचा आढावा घेण्यात यावा.

**कार्यक्रम बाब क्र.५:** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सन २००७-०८ चे सुधारित अंदाज व सन २००८-०९ चे अर्थ संकल्पीय अंदाज..

सदस्य सचिव, यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सन २००७-०८ चे सुधारित अंदाज व २००८-०९ चा अर्थसंकल्पीय अंदाज संचालक मंडळासमोर सादर केले. प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी नमूद केले की, २००८-०९ चे अर्थसंकल्पीय अंदाज ३७ कोटी रुपयांची तूट दर्शविली आहे. अपेक्षित तूट येण्याची कारणे म्हणजे ६ व्या वेतन आयोगाच्या शिफारशी २००८-०९ या वर्षामध्ये लागू झाल्यास वेतन व भत्त्यामध्ये होणारी वाढ अदा करण्यासाठी रुपये १६ कोटी इतकी तरतूद दर्शविण्यात आली आहे. ६ व्या वेतन आयोगाच्या

**मा. अध्यक्ष तथा**
**मंत्री, पा.पु. व स्व.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

शिफारशी अद्याप केंद्र शासनाकडून स्वीकारल्या नसल्यामुळे सध्या अशी तरतूद करण्याची आवश्यकता नाही तेंव्हा ही तरतूद वगळल्यास अंदाजे तूट १६ कोटीने कमी होईल. उर्वरीत २१ कोटींची तूट कमी करण्यासाठी काय उपाय योजना कराव्या लागतील या संदर्भात एक स्वतंत्र आयत्यावेळेची कार्यक्रम बाब क्रमांक -३- सादर करण्यात आली आहे. त्यामध्ये सूचविलेल्या उपाययोजना विचारात घेतल्यास उर्वरित २१ कोटींची तरतूद आणखी कमी करता येणे शक्य आहे. यावर मा.प्रधान सचिव यांनी सांगितले की, त्रुटींचे अर्थसंकल्पीय मंजूर करण्यापेक्षा प्रस्तावित उपाय योजनेनुसार तसेच पाणी पुरवठा केंद्राच्या देखभाल दुरुस्तीमध्ये काटकसर करुन खर्च आटोक्यात ठेवणे आवश्यक आहे. त्या दष्टीने सन २००८-०९ च्या अर्थसंकल्पाचे रिकॉस्टींग करावे व प्रस्तावित उपाय योजनेमुळे कमी होणारा खर्च विचारात घ्यावा असे सूचित केले.

याबाबत मा. मंत्री महोदय, तथा अध्यक्ष, यांनी असे नमूद केले की, राज्य शासनाने ६ व्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू केल्यानंतर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी कर्मचाऱ्यांनादेखील त्या शिफारशी लागू करणे आवश्यक राहील. त्याप्रमाणे या शिफारशी केंव्हा लागू होतील त्याचा अंदाज घेऊन तशी तरतूद ठेवावी. सन २००८-०९ च्या अर्थसंकल्पाचे पूर्ण रिकॉस्टींग करुन सुधारित अर्थसंकल्पीय अंदाज सोबत जोडले आहे. त्यानुसार २००८-०९ या वर्षी रु. ०.८९ लक्ष इतके अधिक्याचे अर्थसंकल्प राहिल. सन २००८-०९ चे अर्थसंकल्पीय अंदाज याचा गोषवारादेखील सोबत ठेवला आहे.

ठराव :-

असा ठराव करण्यात येतो की, सन २००७-०८ चे सुधारित अंदाज व सन २००८-०९ चे अंर्थसंकल्पीय अंदाज पुढीलप्रमाणे सुधारित मान्य करण्यात येत आहे.

(रुपये लाखांत)

| अ.क्र. | तपशिल | सन २००७-०८ चे सुधारित अंदाज | सन २००८-०९ चे अर्थसंकल्पीय अंदाज |
|---|---|---|---|
| १ | महसूली जमा | २८५५९.३८ | २८४४०.८४ |
| २ | महसूली खर्च | २९१३०.९६ | २८४३९.९५ |
| ३ | भांडवली जमा | ७३७१६.९८ | ६९५९०.६५ |
| ४ | भांडवली खर्च | ७३७१६.९८ | ६९५९०.६५ |

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**विषय :- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सन २००७-२००८ चे सुधारित अंदाज व सन २००८- २००९ चे अर्थसंकल्पीय अंदाज**

**सारांश :-**

**१. भांडवली जमा व भांडवली खर्चाच्या प्रस्तावित तरतुदी मुख्यत्वे महाराष्ट्र शासनाच्या अंदाजपत्रकीय तरतुदीव्दारे अपेक्षित अनुदानाच्या अधीन राहून केल्या आहेत. शासनाच्या अंतिम अंदाजपत्रकीय तरतूदीनुसार अपेक्षित अनुदान रकमेत काही फरक / बदल झाल्यास त्याप्रमाणे सन २००७-२००८ च्या सुधारित व सन २००८-२००९ च्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अंदाजपत्रकात बदल होईल.**

नागरी पाणी पुरवठा योजनांवर मंजूर वित्तीय आकृतीबंधानुसार खर्च करणे अपेक्षित आहे. सन २००२-०३ पर्यंत वित्तीय आकृतीबंधानुसार आयुर्विमा महामंडळाकडून कर्ज उपलब्ध होत होते, परंतु त्यानंतर आयुर्विमा महामंडळाने महानगरपालिका/ नगरपालिकांनी कर्जाची परतफेड न केल्याने पुढील कर्ज देण्याचे थांबविले आहे. तसेच खुल्या बाजारातुन कर्ज घेण्याबाबत शासनाची अनुमती मिळत नाही. त्यामुळे यापूर्वी योजनेवर कर्ज उपलब्ध होईल या अपेक्षेने उपलब्ध अनुदानातून खर्च करण्यांत आला आहे. मात्र प्रत्यक्षात अनुदानाच्या प्रमाणात कर्जाची रक्कम उपलब्ध झाली नसल्यामुळे वित्तीय आकृतीबंधाचा विचार करता जास्तीचे अनुदान खर्ची पडून योजनांवरील एकूण खर्च प्रमाणशीर राहीलेला नाही. वित्तीय संस्थांकडून कर्ज मिळण्याचे बंद झाल्याने अनुदान उपलब्ध असूनही तो खर्च करता येत नाही. परिणामी योजनांची प्रगती रखडली असून एकूणच काम ठप्प झाले आहे. या योजना पूर्णत्वास नेण्याकरीता व उपलब्ध अनुदान खर्च करण्याकरीता अशा योजनांना कोणत्या तरी माध्यामातून कर्ज उपलब्ध करुन देणे अत्यंत गरजेचे झाले आहे.

तसेच कर्ज परतफेडीच्या जबाबदारीच्या अनुषंगाने (भूतकाळातील अनुभवानुसार) कर्ज घेण्याची कारवाई यापुढे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाऐवजी स्थानिक स्वराज्या संस्थांनी/नगर विकास विभागाने घेण्याच्या बदलासह महत्वाच्या वित्तीय सुधारणा (Urban Sector Reform) तातडीने होणे गरजेचे आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा कार्यभार दिवसेंदिवस कमी होत चालला असल्याने प्राधिकरणाचा आस्थापना व निवृत्ती वेतनाचा खर्च भागविणे जिकरीचे झाले आहे. या परिस्थितीत सुधारणा झाली नाही अथवा प्राधिकरणास नवीन कामे मिळाली नाहीत तर प्राधिकरणाचे अस्तित्वच धोक्यात येणार आहे असे एकंदरीत चित्र दिसते. प्राधिकरणाची ढासळती स्थिती सुधारण्यासाठी ताकदीने उभे राहण्याचे सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत आहेत उदा. लातूर नागरी पाणी पुरवठा योजना तसेच गोरेगांव प्रादेशिक पाणी पुरवठा योजना (भंडारा जिल्हा) शिरभावी व ८४ गांवे, प्रादेशिक पाणी पुरवठा योजना (जिल्हा सोलापूर) इत्यादी ताब्यात घेवून ग्राहकांपर्यंत थेट पाणी पुरवठा करुन

वसूली करणे, ज्या ग्रामीण योजना हस्तांतरीत झाल्या नाहीत, अशा ठिकाणी योजनांचा Socio Economic अभ्यास करुन सुयोग्य पाणी पट्टी ठरवून वसूली करणे इ. मात्र या उपाय योजना प्राधिकरणाचे अस्तित्व टिकविण्यास अथवा सांपत्तिक स्थिती सुधारण्यास पुरेशा आहेत असे वाटत नाही.

पूर्वी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास हक्काचे काम मिळत असे, आता सर्वच कामे स्पर्धात्कम भूमिकेतून मिळविणे व त्याद्वारे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अस्तित्व टिकविणे अशक्य आहे. कारण १७.५% ई. ॲन्ड. पी. च्या खर्चासह स्पर्धेतून काम मिळविणे अशक्य आहे. अशा परिस्थितीत काही कामे हक्काने शासनाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास देणे गरजेचे झाले आहे.

**सन-२००४-०५ ते २००८-०९ या पाच वर्षातील प्रत्यक्ष तसेच अंदाजित महसुली व भांडवली आयव्यय खालील प्रमाणे आहे.**

( रुपये लाखात)

| अ. क्र. | तपशिल | २००४-०५ प्रत्यक्ष | २००५-०६ प्रत्यक्ष | २००६-०७ प्रत्यक्ष | २००७-०८ मूळ अंदाज | २००७-०८ सुधारित अंदाज | २००८-०९ अर्थसंकल्पिय अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | महसुली जमा | २५३६८.४८ | २४०९३.९८ | २५०२६.६७ | २७६२४.१५ | २८५५९.३८ | २८४४०.८४ |
| २ | महसुली खर्च | २७७४६.०४ | ३३४१०.११ | २९१३३.८३ | ३०५२३.९४ | २९१३०.९६ | २८४३९.९५ |
| ३ | भांडवली जमा | १३२४८९.८२ | ८१४१४.२८ | ६२६६३.३० | ६०४५७.४५ | ७३७१६.९८ | ६९५९०.६५ |
| ४ | भांडवली खर्च | ६०५४६.०२ | ६३५०१.३५ | ५२५७७.६३ | ६०४५७.४५ | ७६७१६.९८ | ६९५९०.६५ |

वरील प्रमाणे सन-२००७-०८ चे सुधारित अंदाज व सन-२००८-०९ चे अर्थसंकल्पीय अंदाज महसुली व भांडवली आयव्यय प्राधिकरणास मान्य असल्यास खालील प्रमाणे ठराव मान्य करावा ही विनंती.

## ठराव :-

**प्राधिरकणाने सन-२००७-०८ चे सुधारित अंदाज व सन-२००८-०९ चे महसुली व भांडवली अर्थसंकल्पीय अंदाज खालील प्रमाणे मान्य करण्यात येत आहे.**

( रुपये लाखात )

| अ.क्र. | तपशिल | सन-२००७-०८ चे सुधारित अंदाज | सन-२००८-०९ चे अर्थसंकल्पीय अंदाज |
|---|---|---|---|
| १ | **महसुली जमा** | २८५५९.३८ | २८४४०.८४ |
| २ | **महसुली खर्च** | २९१३०.९६ | २८४३९.९५ |
| ३ | **भांडवली जमा** | ७३७१६.९८ | ६९५९०.६५ |
| ४ | **भांडवली खर्च** | ७३७१६.९८ | ६९५९०.६५ |

वित्तीय वर्ष -२००७-२००८ च्या मुळ व सुधारित अंदाजानुसार आणि वित्तीय वर्ष २००८-२००९ च्या अर्थसंकल्पीय अंदाजानुसार येणारे अधिक्य अथवा तुटीचा गोषवारा. (विवरणपत्र १ व २ )

( रू. लाखात )

| अ.क्र | वर्ष | आस्थापना | पाणी पुरवठा केंद्राची देखभाल व दुरूस्ती | इतर महसुली | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | महसुली जमा मूळ अंदाज २००७-२००८ | ११८८७.०० | *१२०७३.८८ | ^३६६३.२७ | २७६२४.१५ |
| २ | महसुली खर्च मूळ अंदाज २००७-२००८ | १६०५३.९० | १०२४४.८३ | ४२२५.२१ | ३०५२३.९४ |
| **३** | **अधिक्य / तूट** | **#(-)४१६६.९०** | **#(+)१८२९.०५** | **(-)५६१.९४** | **(-)२८९९.७९** |
| ४ | महसुली जमा सुधारित अंदाज २००७-२००८ | १४१८०.३४ | १०८४३.०४ | ३५३६.०० | २८५५९.३८ |
| ५ | महसुली खर्च सुधारित अंदाज २००७-२००८ | १५२३७.९८ | ८५०५.९२ | ५३८७.०६ | २९१३०.९६ |
| **६** | **अधिक्य / तूट** | **(-) १०५७.६४** | **(+) २३३७.१२** | **(-) १८५१.०६** | **(-)५७१.५८** |
| ७ | महसुली जमा अंदाज २००८-२००९ | १३८५१.३५ | १०८७९.४९ | ३७१०.०० | २८४४०.८४ |
| ८ | महसुली खर्च अंदाज २००८-२००९ | १६१०५.५३ | ८१८९.०८ | ४१४५.३४ | २८४३९.९५ |
| **९** | **अधिक्य / तूट** | **(-) २२५४.१८** | **(+) २६९०.४१** | **(-) ४३५.३४** | **(+) ०.८९** |

* ही जमेची रक्कम अपेक्षित दर्शविलेली आहे. प्रत्यक्ष वसुली त्यापेक्षा कमी होते. सन-२००५-२००६, २००६-२०००७ ची वसुली अनुक्रमे रु.७८.६४ कोटी व ९०.३६ कोटी आहे.

:# हया तुटीचे समायोजन २००८-२००९ मध्ये आस्थापना शिर्षातर्गत करणे आवश्यक आहे. तसेच २००८-२००९ मध्ये जो कार्यभार अपेक्षिला आहे.तो प्रत्यक्षात उपलब्धतेनुसार (बाह्य घटनांच्या परिणामास्वरुप) कमी/जास्त झाल्यास त्याप्रमाणे या शिर्षात अधिक तुट आढळेल

^ ही जमा स्थानिक स्वराज्य संस्थांनी देय कर्ज परत फेडीच्या हप्त्यांच्या रक्कमा वेळीच देणे व ते न झाल्यास जिल्हयाधिका-यांकडून असंविधानिक अनुदानातून कपातीव्दारे वसुली होणेवर अवलंबून आहे.

४

## विवरण पत्र क्रमांक १

### सन २००७-२००८ चे सुधारित व २००८-२००९ चे महसूली जमेचे अर्थसंकल्पीय अंदाज

(रू. लाखात )

| | महसूली मिळकतीच्या बाबी | प्रत्यक्ष जमा | प्रत्यक्ष जमा | प्रत्यक्ष जमा | मुळ अंदाज | सुधारित अंदाजपत्रक | अर्थसंकल्पीय अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २००४-०५ | २००५-०६ | २००६-०७ | २००७-०८ | २००७-०८ | २००८-०९ |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| अ | | | | | | | |
| १ | आस्थापने, हत्यारे व संयंत्रे आकाराची वसुली | ११३३८.८२ | १०७४३.१७ | १११८२.१७ | ११८८७.०० | १४१८०.३४ | १३८५१.३५ |
| * २ | पाणी विक्री ,मिटर भाडे इत्यादी पासून महसूल | ११६६३.९३ | १११८९.६७ | ११७५०.६० | १२०७३.८८ | १०८४३.०४ | १०८७९.४९ |
| ३ | हुडको संशोधन विकास निधी | ० | ० | ० | ०.०० | ० | ११५.०० |
| | **एकूण अ** | २३००२.३५ | २१९३२.८४ | २२९३२.७७ | २३९६०.८८ | २५०२३.३८ | २४८४५.८४ |
| ब | | | | | | | |
| | प्रकल्प कर्जावरील व्याज | २३६६.१३ | २१६१.१४ | २०९३.९० | ३६६३.२७ | ३५३६.०० | ३५९५.०० |
| # | महानगरपालीकं /नगरपालीका यांना दिलेल्यं कर्जावरील व्याज (आयुर्विमा कर्ज,खु. बा. कर्ज , तुटीचे कर्ज, हुडको कर्ज ) | | | | | | |
| | **एकूण महसूल (अ+ब )** | २५३६८.४८ | २४०९३.९८ | २५०२६.६७ | २७६२४.१५ | २८५५९.३८ | २८४४०.८४ |

टिप :-* स्थानिक स्वराज्य संस्थाकडून येणे रकमेची वसुली अपेक्षेनुसार होण्यावर ही जमा अवलंबून आहे.

# याबाबतही नियत देय दिनांकापासून या रकमा प्राप्त होणे अपेक्षित आहे. प्रत्यक्ष जमा ही यापेक्षा खुप कमी असते.

## विवरणपत्र क्रमांक २

### सन २००७-२००८ चे सुधारित अंदाज २००८-२००९ चे महसुली खर्चाचे अंदाज

(रू. लाखात )

| अ.क्र | महसुली खर्चाची बाब | लेखा शिर्ष क्रमांक | २००४-२००५ प्रत्यक्ष खर्च | २००५-२००६ प्रत्यक्ष खर्च | २००६-२००७ प्रत्यक्ष खर्च | २००७-२००८ अर्थसंकल्पीय अंदाज | २००७-२००८ सुधारित अंदाज | २००८-२००९ अर्थसंकल्पीय अंदाज | फरक (८-७) | फरकाची कारणे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| | अ | | | | | | | | | |
| १ | वेतन व भत्ते | २.११ | ९९४८.७७ | ९७६६.६७ | ९९१५.०१ | ९७५०.०४ | ८८६७.९३ | ९१८७.१६ | ८८२.११ | क्षेत्रीय व विभागीय /उपविभागीय कार्यालय बंद झाल्याने व कर्मचारी जि.प.कडे प्रतिनियुक्तीवर गेल्याने |
| २ | प्रवास खर्च | २.१२ | २४९.१३ | २२८.४५ | २५३.५७ | २९५.३१ | २०२.५५ | २१२.६७ | (-)९२.७६ | प्रत्यक्ष खर्चावर आधारीत |
| ३ | वैद्यकीय खर्च | २.१३ | १६४.०३ | १७६.१२ | १५३.२९ | १५३.०० | १५२.५७ | १५५.०० | (-)०.४३ | प्रत्यक्ष खर्चावर आधारीत |
| ४ | गणवेष व वर्दी | २.१४ | ७.७८ | ९.७६ | ७.०३ | ६.८६ | ६.९६ | ७.३० | (-)०.१० | प्रत्यक्ष खर्चावर आधारीत |
| ५ | प्रशिक्षण खर्च अ)संगणक प्रशिक्षण ब) इतर | २.१५ | २.५४ | १.८४ | ८.०६ | १०.०० | ४.३४ | ४.५५ | (-)५.६६ | प्रत्यक्ष खर्चावर आधारीत |
| ६ | निवृत्ती वेतन व रजा वेतन अंशदान | २.१६ व २.१८ | (-)३.०१ | २.०२ | ३.०१ | ३.०० | २.०० | २.०० | (-)१.० | प्रतिनियुक्तीवरील कर्मचारी संख्येत घट |
| ७ | मुद्रण व लेखन सामुग्री | २.२०१ | ८७.२९ | ८८.३० | ९३.९६ | ९०.५२ | ६३.१४ | ६५.०० | (-)२७.३८ | कार्यालय बंद झाल्यामुळे |
| ८ | जाहिरात व प्रसिध्दी | २.२०२ | ३.७६ | ३.९६ | ४.०८ | ३.५० | ५.३६ | ४.५७ | (+)१.८६ | प्रत्यक्ष खर्चावर आधारीत |
| ९ | टपाल/दुरध्वनी इतर खर्च | २.२०३ | ७९.२७ | ७९.८९ | ७९.४८ | ८०.७९ | ६०.४० | ६१.०० | (-)२०.३९ | काटकसर उपाययोजना |
| १० | पुस्तके व नियतकालिके | २.२०५ | ०.३० | २.०३ | ०.१४ | ०.१० | ०.२० | ०.१० | (+)०.१० | प्रत्यक्ष खर्चावर आधारीत |
| ११ | विज व पाणी खर्च | २.२०६ | ८०.८९ | ६८.७४ | ६०.७३ | ८९.७१ | ७९.२३ | ८०.०० | (-)१०.४८ | काटकसर उपाययोजना |
| १२ | भाडेपटटी व कर | २.२०७ | १३७.४४ | ८२.८६ | ८४.९५ | १५०.३५ | ८८.२४ | ९०.०० | (-)६२.११ | प्रत्यक्ष खर्चावर आधारीत |
| १३ | लेखा परीक्षण व शुल्क | २.२०८ | २०.६० | ११.९८ | ०.५२ | २०.०० | २०.०० | २०.०० | | |
| १४ | आतिथ्यविषयक खर्च | २.२०९ | ०.३० | ०.४० | ०.६९ | १.०० | ०.८४ | ०.९० | (-)०.१६ | प्रत्यक्ष खर्चावर आधारीत |
| १५ | परिषदा व चर्चासत्रे | २.२१० | ३.३९ | ०.०८ | ३.३९ | ०.५० | ०.४५ | ०.४५ | (-)०.०५ | प्रत्यक्ष खर्चावर आधारीत |
| १६ | किरकोळ खर्च (बँक खर्च /कार्यालयीन खर्च झेरॉक्स इ.) | २.२११ | १२९.९८ | १३७.४९ | ३९०.९४ | ७५.३८ | ११०.८८ | ११२.०० | (+)३५.५० | प्रत्यक्ष खर्चावर आधारीत |
| १७ | कायदेविषयक शुल्क | २.२२३ | ५.४५ | २.९६ | ५.४९ | ३.०० | १.६८ | २.०० | (-)१.३२ | प्रत्यक्ष खर्चावर आधारीत |
| १८ | खेळ व सांस्कृतिक कार्यक्रम | २.२४६ | ०.२० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | | |



८

विवरणपत्र क्रमांक २

सन २००७-२००८ चे सुधारित अंदाज २००८-२००९ चे महसुली खर्चाचे अंदाज

(रू. लाखात )

| अ.क्र | महसुली खर्चाची बाब | लेखा शिर्ष क्रमांक | २००४-२००५ प्रत्यक्ष खर्च | २००५-२००६ प्रत्यक्ष खर्च | २००६-२००७ प्रत्यक्ष खर्च | २००७-२००८ अर्थसंकल्पीय अंदाज | २००७-२००८ सुधारित अंदाज | २००८-२००९ अर्थसंकल्पीय अंदाज | फरक (८-७) | फरकाची कारणे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | १० | ११ |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | | |
| १९ | निवृत्ती वेतन व उपदानासाठी होणारा खर्च. | १८.१२ | ४०२५.०० | ४४६१.०० | ४६५८.०० | ४५००.०० | ४९००.०० | ५३००.०० | (+)४००.०० | निवृत्ती वेतन कर्मचारी संख्येत व ढ व महागाई भत्ता समाविष्ट |
| २० | संशोधन व प्रशिक्षण निधी | | ०.०० | ०.०० | ०.०० | ७५.०० | ०.०० | ११५.०० | | |
| २१ | ठेव सलग्न विमा योजना | | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ३७.४० | ३७.५० | | |
| | एकूण (अ) | | १४९४३.०२ | १५१२४.५५ | १५७२२.३४ | १५३०८.०६ | १४६०४.१७ | १५४५७.२० | | |
| १ | वाहन देखभाल दुरुस्तीचा खर्च | २३० व २५१ | १५४.८६ | ३३७.९१ | ३०६.२४ | ३५०.६४ | २६०.३२ | २७३.३३ | (-)९०.३२ | काटकसर उपाययोजना |
| २ | इमारत.हत्यारे.संयंत्र देखभाल दुरस्ती | २५२ व २५४ | १४५.५६ | १५७.८८ | २११.९६ | २१०.२० | १८८.४९ | १९०.०० | (-)२१.७१ | काटकसर उपाययोजना |
| ३ | घसारा आकार | | १८४.८६ | १८४.९८ | १८७.५७ | १८५.०० | १८५.०० | १८५.०० | | |
| | एकूण (ब) | | ४८५.२८ | ५२६.४० | ७०५.७७ | ७४५.८४ | ६३३.८१ | ६४८.३३ | | |
| | एकूण (अ + ब) | | १५४२८.३० | १५६५०.९५ | १६४२८.११ | १६०५३.९० | १५२३७.९८ | १६१०५.५३ | | |
| | क) | | | | | | | | | |
| क) १ | निगा ,देखभाल व दुरुस्तीचा पाणी पुरवठा केंद्राचा खर्च | २.४० | ७९२५.३४ | १२५२४.९७ | ८४८३.०७ | १०२४४.८३ | ८५०५.९२ | ८१८९.०८ | (-)१७३८.९१ | पाणी पुरवठा केंद्र हस्तांतरीत झाल्याने व दे.दु.चा म.जी.प्रा.चा खर्च कमी झाल्याने |
| | एकूण अ+ ब+ क | | २३३५३.६८ | २८१७५.९८ | २४९११.१८ | २६२९८.७३ | २३७४३.९० | २४२९४.६१ | | |
| ड)१. | आयु.महा.मंडळ/खुल्या बाजारात | | ४२२४.४० | ५०९७.३४ | ४०८५.८० | ४०५४.५० | ५२०५.१५ | ३९९४.५९ | | |
| | तील हुडको/त्रुटी कर्जावरील व्याज | | | | ०.०० | | | | | |
| २ | प्रकल्प कर्जावरील व्याज | | ०.०० | ०.०० | ०.०० | ६५.०० | ७६.२० | ७६.२० | | |
| ३ | कर्ज निवारण निधी | | १६८.०० | १३६.८५ | १३६.८५ | १०५.७१ | १०५.७१ | ७४.५५ | | |
| | एकूण (ड) | | ४३९२.४० | ५२३४.१९ | ४२२२.६५ | ४२२५.२१ | ५३८७.०६ | ४१४५.३४ | | |
| | एकूण अ+ ब+ क+ ड | | २७७४६.०४ | ३३४१०.११ | २९१३३.८३ | ३०५२३.९४ | २९१३०.९६ | २८४३९.९५ | | |

विवरण पत्र क्रमाक ३

सन २००७-२००८ चे सुधारित अंदाज व २००८-२००९ चे भांडवली जमेचे अर्थसंकल्पीय अंदाज.

(रू. लाखात )

| अ. क्र. | भांडवली जमा तपशील | २००४-२००५ प्रत्यक्ष जमा | २००५-२००६ प्रत्यक्ष जमा | २००६-२००७ प्रत्यक्ष जमा | २००७-२००८ अर्थसंकल्पीय अंदाज | २००७-२००८ सुधारित अंदाज | २००८-२००९ अर्थसंकल्पीय अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| अ) १ | **नागरी पाणी पूरवठा योजना.** | | | | | | |
| १ | नगरपालिकांसाठी पाणी पूरवठा योजना साठी शासन अनुदान | ५३३१.२९ | ४०९०.४१ | ३३५०.०० | २०००.०० | ६२८८.१९ | ०.०० |
| २ | न.पा.च्या अनुशेष योजना साठी/प्रादेशिक असमतोल शासन अनुदान | ० | १३५६.०० | ८८५.०० | ४९९.०० | १२४.०० | ०.०० |
| ३ | वर्धित वेग नागरी पाणी पूरवठा योजना | | | | | | |
| | राज्य हिस्सा | ४००.०० | १४९२.८० | ५००.०० | ७००.०० | ७००.०० | १०९७.५८ |
| | केंद्र हिस्सा | ५००.०० | १३२५.०३ | ५००.०० | ४००.०० | ४६२.०६ | ५७०.०० |
| ४ | संत गाडगे बाबा स्वच्छता अभियान | २८३.५० | १०००.०० | ६००.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ५ | (नागरी)दलीतवस्ती पा.पु. योजना. | ०.०० | ०.०० | ९४९.५२ | ० | ० | ०.०० |
| ६ | वैधानिक विकास मंडळ (अमरावती पा.पु.यो.) | ०.०० | २३२.६८ | ३००.०० | ० | ० | ०.०० |
| ७ | पूर नियंत्रण व्यवस्थापन (पाईप लाईन) सक्षम करणेसाठी २५% | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | २०६.०० | ०.०० |
| | **एकूण अ) १** | **६५१५.१९** | **९४९६.९२** | **७०८४.५२** | **३५९९.००** | **७७८०.२५** | **१६६७.५८** |
| अ-२ | **स्वच्छता योजना** | | | | | | |
| | कमी खर्चाच्या स्वच्छता योजना | **०.००** | **१०.००** | ०.०० | ० | ०.०० | ०.०० |
| अ-३ | **अर्थसंकल्पबाहय निधी उभारणीतून हाती घ्यावयाच्या योजना** | | | | | | |
| १ | कर्ज रोखे (मुंबई महानगर विकास प्राधिकरण) | ६३९५४.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ५३१२.०० | ०.०० |
| २ | हुडको | २६९८.०० | ०.०० | ०.०० | ६७४.५० | ० | ०.०० |
| ३ | आयुर्विमा महामंडळाकडून कर्ज | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | **एकूण अ) ३** | **६६६५२.००** | **९५०६.९२** | **७०८४.५२** | **६७४.५०** | **५३१२.००** | **०.००** |



६

### विवरण पत्र क्रमाक ३

### सन २००७-२००८ चे सुधारित अंदाज व २००८-२००९ चे भांडवली जमेचे अर्थसंकल्पीय अंदाज.

(रू. लाखात)

| अ. क्र. | भांडवली जमा तपशील | २००४-२००५ प्रत्यक्ष जमा | २००५-२००६ प्रत्यक्ष जमा | २००६-२००७ प्रत्यक्ष जमा | २००७-२००८ अर्थसंकल्पीय अंदाज | २००७-२००८ सुधारित अंदाज | २००८-२००९ अर्थसंकल्पीय अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| अ) ४ | **इतर** | | | | | | |
| १ | गळती शोध कार्यक्रम | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| २ | अकरावा वित्त आयोगाच्या शिफारशी नुसार विशेष अनुदान | २००.२० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ३ | राष्ट्रीय नदी कृती कार्यक्रम | ६४०.०० | ३२००.०० | ६६४.०० | ६५०.०० | ६४५.०० | ६४०.०० |
| | एकूण अ) ४ | ८४०.२० | ३२००.०० | ६६४.०० | ६५०.०० | ६४५.०० | ६४०.०० |
| | एकूण अ१,अ२,अ३,अ४ | ७४००७.५९ | १२७०६.९२ | ७७४८.५२ | ४१२३.५० | १३७३७.२५ | २३०७.५८ |
| ब | **ग्रामीण पा.पु. योजना** | | | | | | |
| १ | किमान गरजा कार्यक्रम | | | | | | |
| | अ)बिगर आदिवासी | ७०१४.९६ | ८१०६.४५ | ३१७२.६९ | २४०८.५२ | २४०८.५२ | ४३१.४५ |
| | ब) आदिवासी | ११९२.९१ | ६३३.८२ | २७१.१८ | २४१.३५ | २७६.७२ | १५२.०५ |
| २ | वर्धित वेग पाणी पूरवठा योजनांसाठी शासन अनुदान | २६११३.३७ | ३५६१२.८१ | ३८७८५.७३ | ३५५२०.०० | ४९४७२.५९ | ५००००.०० |
| ३ | जागतिक बँक प्रकल्प | ४२२.९७ | ०.०० | ४५.१३ | २९५.०० | ० | २९५.०० |
| ४ | ग्रामीण पायाभूत विकास निधी अंतर्गत अनुदान | २४००.०० | २३४०.१० | ०.०० | ०.०० | १७३१.९७ | १५२०.७२ |
| ५ | संत गाडगे बाबा स्वच्छता अभियान (ग्रामीण) | २९२.५० | १८५.९५ | ३१७.१० | १०९९.०० | १०९९.०० | १०००.०० |
| | एकूण ब | ३७५१६.७१ | ४६८७९.१३ | ४२५९१.८३ | ३९५६३.८७ | ५४९८८.८० | ५३३९९.२२ |
| क | **कर्ज - ग्रामीण** | | | | | | |
| १ | आयुर्विमा महामंडळाकडून ग्रा.पा.पु. कर्ज | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| २ | कर्ज रोखे | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ३ | हुडको व इतर | ५९००.०० | ६५००.०० | ०.०० | ७२००.०० | ०.०० | ०.०० |
| ४ | नाबाड कर्ज फेज-२ | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | |
| | एकूण क | ५९००.०० | ६५००.०० | ०.०० | ७२००.०० | ०.०० | ०.०० |

विवरण पत्र क्रमांक ३

सन २००७-२००८ चे सुधारित अंदाज व २००८-२००९ चे भांडवली जमेचे अर्थसंकल्पीय अंदाज.

(रू. लाखात)

| अ. क्र. | भांडवली जमा तपशील | २००४-२००५ प्रत्यक्ष जमा | २००५-२००६ प्रत्यक्ष जमा | २००६-२००७ प्रत्यक्ष जमा | २००७-२००८ अर्थसंकल्पीय अंदाज | २००७-२००८ सुधारित अंदाज | २००८-२००९ अर्थसंकल्पीय अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| **ड** | **नगरपालीकां कडूनकर्ज वसूली** | | | | | | |
| १ | आयुर्विमा कर्ज | ०.०० | ०.०० | ०.०० | २८३५.०० | ६७५.०० | ६७८९.४१ |
| २ | खुल्या बाजारातील आणि प्रकल्प कर्ज | ०.०० | ०.०० | ०.०० | १८०५.९७ | ४३५.०० | ४३५.०० |
| ३ | हुडको कर्ज | ०.०० | ०.०० | ०.०० | ५६.०० | १.०० | ४.०० |
| | **एकूण** | **४८९३.०७** | **५३४९.०२** | **४५८८.६५** | **४६९६.९७** | **१११.००** | **७२२८.४१** |
| २ | **हमी शुल्काची वसूली** | **१९२.५०** | **२४०.९५** | **१७५.००** | **१६७.००** | **१४७.००** | **१४५.००** |
| | **एकूण ड** | **५०८५.५७** | **५५८९.९७** | **४७६३.६५** | **४८६३.९७** | **१२५८.००** | **७३७३.४१** |
| **इ** | **राखीव निधी** | | | | | | |
| १ | घसारा निधी | २०९७.७७ | ३६९६.६४ | १६६१.९५ | १४९४.८ | १५०१.८० | १६००.०० |
| २ | कर्ज निवारण निधी | १६८.०० | १३६.८५ | १३६.८५ | १०५.७१ | १०५.७१ | ७४.५५ |
| | **एकूण इ** | **२२६५.७७** | **३८३३.४९** | **१७९८.८०** | **१६००.५१** | **१६०७.५१** | **१६७४.५५** |
| **फ** | **इतर वसूली** | | | | | | |
| १ | पूर्ण ठेवी योजना | ७७१४.३८ | ५९०४.७७ | ५७६०.५० | ५२०५.९ | २७००.०० | ४८३५.०० |
| २ | महसूली अधिक्य/तुट | ०.०० | ०.०० | ०.०० | (-)२८९९.७९ | (-)५७१.५८ | (+)०.८९ |
| | **एकूण फ** | **७७१४.३८** | **५९०४.७७** | **५७६०.५०** | **२३०६.११** | **२१२८.४२** | **४८३५.८९** |
| | **एकूण अ,ब,क,ड,इ,फ** | **१३२४८९.८२** | **८१४१४.२८** | **६२६६३.३०** | **६०४५७.४५** | **७३७१६.९८** | **६९५९०.६५** |

## विवरणपत्र क्रमांक ४

### सन २००७-२००८ चे सुधारित अंदाज व २००८-२००९ चे भांडवली खर्चाचे अर्थसंकल्पीय अंदाज (रू. लाखात)

| अ. क्र. | भांडवली खार्चाचा तपशिल | प्रत्यक्ष खच २००४-०५ | प्रत्यक्ष खच २००५-०६ | प्रत्यक्ष खच २००६-०७ | मूळ अंदाज २००७-०८ | सुधारित अंदाज २००७-०८ | अर्थसंकल्पीयअंदाज २००८-०९ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| अ | **नागरी योजना** | | | | | | |
| १ | वर्धित वेग पा.पु.यो. (केंद्र हिस्सा/राज्य हिस्सा) | १८५.८९ | ३३२.७६ | ३५०.९४ | ११००.०० | ११६२.०६ | १६६७.५८ |
| २ | नगरपालिकांच्या पा.पु.यो. (हुडको कर्ज व इतर कर्जरोख्यासहित | १९३४७.२० | १७२८२.२३ | १४११८.९० | ३८२३.५० | १२३६९.५९ | ६४०.०० |
| ३ | कमी खर्चाची स्वच्छता योजना | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४ | पूरानियंत्रण व्यवस्थापन (पाईपलाईन)सक्षम करणेसाठी २५% अनुदान | | | | | २०६.०० | ० |
| | एकूण अ | **१९५३३.०९** | **१७६१४.९९** | **१४४६९.८४** | **४९२३.५०** | **१३७३७.२५** | **२३०७.५८** |
| ब | **ग्रामीण योजना** | | | | | | |
| १ | किमान गरजा कार्यक्रम | ८८७९.८६ | ५८९८.४९ | ८१३२.४९ | ३७४८३८७ | २६८५.२४ | ५८३.५० |
| २ | वर्धित वेग पा.पु.यो. केंद्र हिस्सा | १५९७१.०० | १०५४६.२२ | ८८४४.६० | ३५५२०.०० | ४१४७२.५९ | ५००००.०० |
| | कर्ज रोखे व इतर | ५८१४.०९ | १७४२०.६३ | १०५९७.८९ | ७२००.०० | ० | ० |
| ३ | भुकंपग्रस्त सहाय्य यो. | ०.३० | ० | 0 | ०.०० | ० | ० |
| ४ | जागतिक बँक प्रकल्प | ७०६.९० | ५.६३ | ५६.९२ | २९५.०० | ० | २९५.०० |
| ५ | ग्रामीण पा.पु.संत गाडगेबाबा | ० | ० | ० | ०.०० | २८३०.९७ | २५२०.७२ |
| | एकूण ब | **३१३५२.१७** | **३३७८०.००** | **२७६३१.९७** | **४६७६३.८०** | **५४९८८.८०** | **५३३९९.२२** |
| क | **इतर खर्च** | | | | | | |
| १ | पुर्ण ठेवी योजना | ७३५०.२५ | ८६९७.८५ | ८१३२.४९ | ३३१५.७३ | १२९२.८६ | १०१६५.७० |
| २ | हत्यारे,सयंत्रे,वाहने, खरेदी | ३७.०० | ६.५१ | १.३६ | १२.०० | १०.०० | ८.०० |
| ३ | अग्रिमे | | | | | | |
| | अ) वाहन खरेदी | ० | ० | | ० | ० | ० |
| | ब) घरबांधणी अग्रिमे | ५८.७३ | ६०.०० | ० | ६०.०० | ११.०२ | ३०.०० |
| | क)संगणक अग्रिमे | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ३ | शासनाकडे जमा करण्यात आलेली भ.नि. रक्कम | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४ | कार्यालयीन इमारत, निवासस्थाने,विश्रामगृह इ.बांधकाम खर्च | ० | १.४४ | ६०.३९ | २०.०० | २३.४० | २५.०० |
| ५ | कार्यालयीन साहित्य | ० | ० | ० | २.०० | १.०० | १.५० |
| ६ | इतर किरकोळ खर्च व गुंतवणुक | ०.०० | ० | ० | ५.०० | १.०० | २.०० |
| | एकूण (क) | **७४४५.९८** | **८७६५.४०** | **८१९४.२०** | **३४१४.७३** | **१३३९.१८** | **१०२३२.२०** |
| ड | **नगरपालीकां कडूनकर्ज परतफेड** | ० | ० | ० | ० | ० | ० |
| १ | आयुर्विमा कर्ज | ११३५.६३ | ७८१.८५ | १४२६.६९ | २११७.०० | २११७.०० | २११७.०० |
| | खुल्या बाजारातील प्रकल्प कर्ज | ७२८.२० | २४०४.१४ | ७४३७० | २६८८.३५ | ९८४.६५ | ९८४.६५ |
| | हुडको कर्ज | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | एकूण | **१८६३.८३** | **३१८५.९९** | **२१७०.३९** | **४८०५.३५** | **३१०१.६५** | **३१०१.६५** |
| २ | हमी शुल्काची वसूली | ३३०.९५ | १५४.९९ | १११.३० | ५५०.०० | ५५०.०० | ५५०.०० |
| | एकूण ड | **२१९४.७८** | **३३३९.९९** | **२२८१.६९** | **५३५५.३५** | **३६५१.६५** | **३६५१.६५** |
| | एकूण (अ)(ब)(क)(ड) | **६०५४६.०२** | **६३५०१.३५** | **५२५७७.६३** | **६०४५७.४५** | **७३७१६.९८** | **६९५९०.६५** |

## विवरणपत्र क्रमांक ५

अर्थसंकल्प बाह्य निधी वित्तीय संस्थाकडून कर्जरोख्याव्दारे उभारण्यात येणा-या शासन तरतूदीमधुन करावयाची परतफेड

(रुपये कोटीत)

| अ. क्र. | तपशिल | निधी उभारण्याचे वर्ष | उभारलेला निधी | २००६-०७ पर्यंत केलेली परतफेड | सन-२००७-०८ मध्ये करावयाची परतफेड | | | सन-२००८-०९ मध्ये करावयाची परतफेड | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | मुद्दल | व्याज | एकूण | मुद्दल | व्याज | एकूण |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १) | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे कर्ज सहाय्य | १९९७-९८ | १००.०० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | **एकूण-१** | | | | | | | | | |
| २) | कर्ज रोखे | | | | | | | | | |
| | मालिका-१ | १९९७-९८ | २९९.०० | २९९.०० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | शिल्लक मालिका-१ | | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | मालिका-२ | १९९८-९९ | ५३८.८७ | ५३८.८७ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | मालिका-३ | १९९८-९९ | ८८.५० | ८८.५० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | मालिका-४ | १९९९-२००० | २४९.९९ | २४९.९९ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | मालिका-५ | १९९९-२००० | १६९.१३ | ४४.२४ | २३.८३ | १६.२७ | ४०.१० | २३.८३ | १३.०५ | ३६.८८ |
| | मालिका-६ | २०००-२००१ | ४१५.७९ | ५१.०९ | ३६४.७० | ३९.९७ | ४०४.६७ | ० | ० | ० |
| | मालिका-७ | २०००-२००१ | ८३.९८ | ३.६२ | १३.३७ | १०.८२ | २४.१९ | ० | ९.०४ | ९.०४ |
| | मालिका-८ | २००१-२००२ | ९०.४८ | ६१.३७ | ० | ३.५४ | ३.५४ | २०.०५ | ३.५४ | २८.५९ |
| | मालिका-९ | २००२-२००३ | ५५.०६ | ०.०० | ३७.८१ | ६.१४ | ४३.९५ | ० | १.९७ | १.९७ |
| | मालिका-१० | २००२-२००३ | ५७.४७ | ०.०० | २०.३८ | ६.४५ | २६.८३ | ० | ४.२१ | ४.२१ |
| | मालिका-११ | २००३-२००४<br>२००४-२००५ | २०१.१० | ०.० | ०.०० | १८.८० | १८.८० | ०.०० | १८.८० | १८.८० |
| | मालिका-१२ | २००४-२००५ | ५८४.२० | ०.०० | ०.०० | ४६.२० | ४६.२० | ०.०० | ४६.२० | ४६.२० |
| | **एकूण-२** | | २८३३.५७ | १३३६.६८ | ४६०.०९ | १४८.१९ | ६०८.२८ | ४८.८८ | ९६.८१ | १४५.६९ |
| | **परतफेड** | | १७९६.७७ | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | **शिल्लक मालिका** | | १०३६.८० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ३) | हुडको | | | | | | | | | |
| | टप्पा-१ | | २००.०० | १०६.०५ | २५.८१ | ६.९५ | ३२.७६ | २५.८१ | ४.८२ | ३०.६३ |
| | टप्पा-२ | | १९०.०० | ५६.०५ | ३२.२८ | ११.१८ | ४३.४६ | ३२.२८ | ७.७१ | ३९.९९ |
| | टप्पा-३ | | २७०.०० | ७६.५० | ४३.७१ | १५.९४ | ५९.६५ | ४३.७१ | ११.४३ | ५५.१४ |
| | टप्पा-४ नागरी | | ४७.२२ | ९.३४ | ४.१५ | २.९९ | ७.१४ | ४.१५ | २.६५ | ६.८० |
| | एकूण हुडको-३ | | ७०७.२२ | २४७.९४ | १०५.९५ | ३७.०६ | १४३.०१ | १०५.९५ | २६.६१ | १३२.५६ |
| | परतफेड | | ३५३.८९ | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | शिल्लक मालिका | | ३५३.३३ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | **एकूण (१+२+३)** | | १३९०.१३ | १५८४.६२ | ५६६.०८ | १८५.२५ | ७५१.२८ | १५४.८३ | १२३.४२ | २७८.२५ |

**कार्यक्रम बाब क्र.६ :** म.जी.प्रा. चे सन २००५-०६ चा प्रशासनिक वार्षिक अहवालास मान्यता देणे ..

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा सन २००५-०६ या वर्षाचा वार्षिक अहवाल संचालक मंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यांत आले.

सन २००५-०६ या वर्षाचा वार्षिक अहवाल विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहापुढे ठेवण्याबाबत मा. अध्यक्ष यांनी असे निर्देश दिले.

**ठराव :**

असा ठराव करण्यात येतो की, प्राधिकरणाचा सन २००५-०६ या वर्षाचा वार्षिक अहवाल स्वीकृत करण्यांत येत असून व विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहापुढे सादर करण्याकरिता सदर अहवाल शासनाकडे पाठविण्याची संमत्ती देण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.७ :** म.जी.प्रा. चे सन २००५-०६ चा वार्षिक लेखापरिक्षण अहवालास मंजूरीबाबत ..

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सन २००५-०६ या वर्षाचा वार्षिक लेखा परिक्षण अहवाल व त्यावरील अनुपालन संचालक मंडळाच्या बैठकीत मान्यतेसाठी सादर करण्याचे विषद करण्यांत आले. लेखा परिक्षण अहवाल व त्यावरील अनुपालन मान्यतेनंतर वार्षिक अहवालासह विधी मंडळाच्या दोन्ही सभागृहापुढे सादर करण्यांत येणार आहे. असे स्पष्ट करण्यांत आले. चर्चेअंती पुढील प्रमाणे ठराव संम्मत करण्यात आला.

**ठराव :**

असा ठराव करण्यांत येतो की, प्राधिकरणाचा सनु २००५-०६ चा वार्षिक लेखा परिक्षण अहवाल व त्यावरील अनुपालनास मान्यता देण्यात येत आहे. तसेच सन २००५-०६ या वार्षिक लेखा व लेखा परिक्षण अहवाल राज्याच्या विधी मंडळाच्या दोन्ही सभागृहापुढे सादर करण्याकरिता सदर अहवाल शासनाकडे पाठविण्याची संमती देण्यात आली आहे.

**मा. अध्यक्ष तथा**
**मंत्री, पा.पु. व स्व.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

**कार्यक्रम बाब क्र.८ :** म.जी.प्रा.भंडारा विभाग व उप विभागासाठी प्रशासकीय इमारत बांधकामास जास्त झालेल्या खर्चास मंजूरी मिळणेबाबत.

सदर कार्यक्रम बाबीमधील सर्व बाबीवर मा. सदस्य सचिव यांनी संचालक मंडळासमोर ठेवलेल्या माहितीच्या अनुषंगाने चर्चा करुन खाली प्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

भंडारा येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम विभाग व दोन उप विभागीय कार्यालयांकरिता बांधकाम करण्यंत आलेल्या कार्यालयीन इमारतीच्या मुळ मंजूर किंमतीपेक्षा रु.६.९६ लक्ष जास्त खर्च झाला आहे. या वाढीव खर्चास मान्यता देण्यात येत असून, सदर खर्च सन २००८-०९ या वर्षीच्या म.जी.प्रा.च्या इमारती व बांधकामे या शीर्षांतर्गत मंजूर तरतूदीतून खर्च भागविण्यांत यावा. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यांस सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यांत येत आहे.

**आयत्या वेळेची कार्यक्रम बाब क्र.१ :** तिरोडा वाढीव पाणी पुरवठा योजनेकरिता रु. २१.९९ लक्ष खुल्या बाजारातील कर्ज वर्ग करुन देण्याबाबत..

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने वरील योजनेस इचलकरंजी पाणी पुरवठा योजनेचे वित्तीय आकृतीबंध सुधारीत झाल्यामुळे अतिरिक्त झालेले खुल्या बाजारातील कर्ज तिरोडा पाणी पुरवठा योजनेवर खुल्या बाजारातील कर्ज तिरोडा पाणी पुरवठा योजनेवर इचलकरंजी उपलब्ध करुन घेऊन, वर्ग करण्याबाबतचे सदरची कार्यक्रम बाब सादर करण्यांत आली. सदर बाबीबाबीत वित्तीय सल्लागर व मुख्य लेखा अधिकारी यांनी संचालक मंडळास अवगत केले. अंतिमतः सादर केलेल्या कार्यक्रम बाबीवर संचालक मंडळाने तत्वतः मान्यता दिल्याने खालील प्रमाणे ठराव पारित करण्यांत आला.

**ठराव :**

असा ठराव करण्यांत येतो की, इचलकरंजी शहर पाण पुरवठा योजना टप्पा क्र.५ व टप्पा क्र. ६ भाग-१ (कृष्णा नदी उद्भव ) (अंदाजित किंमत रु. १८०३.०० लक्ष ) योजनेवरील शिल्लक राहिलेले रु. २१.९९ लक्ष खुल्या बाजारातील कर्ज महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या तिरोडा पाणी पुरवठा (अंदाजित किंमत रु. ८१.७८ लक्ष ) योजनेवर वर्ग करण्यात यावे. तिरोडा पाणी पुरवठा योजना म.जी.प्रा.ने स्वतःची योजना म्हणून चालविण्याचा निर्णय झाल्याने या कर्जाची परतफेडीची जबाबदारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची राहील. याबाबत पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**आयत्या वेळेची कार्यक्रम बाब क्र.२ :** स्थानिक स्वराज्य संस्थांकडील थकबाकी वसुलीसाठी पाणीपट्टी व इतर थकबाकीवरील विलंब आकार, तसेच कर्जावरील दंडनिय व्याज या करिता सुधारित निर्भय योजना लागू करणेबाबत..

सदर बाबीबाबीत वित्तीय सल्लागर व मुख्य लेखा अधिकारी यांनी संचालक मंडळास अवगत केले. अंतिमतः सादर केलेल्या कार्यक्रम बाबीवर संचालक मंडळाने तत्वतः मान्यता दिल्याने खालील प्रमाणे ठराव पारित करण्यांत आला.

**ठराव :**

असा ठराव करण्यात येतो की, ज्या स्थानिक स्वराज्य संस्था / ग्राहक/ जिल्हा परिषद / ग्राम पंचायत सुधारित निर्भय योजनेच्या वरील कार्यक्रम बाबीतील अ.क्र. १ ते १४ वरील अटी व शर्तीची पुर्तता करतील. त्यांना विलंब आकार व दंडनीय व्याजात सवलतीची निर्भय योजना दिनांक १.६.२००८ ते ३१.५.२००९ पर्यंत लागू करण्यांत यावी. याबाबत शासनाची मान्यता मिळवून पुढील कार्यवाही करण्यांबाबत सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यांत आले.

**आयत्या वेळेची कार्यक्रम बाब क्र.३:** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा करण्याच्या दृष्टीने केलेल्या व करण्यांत येत असलेल्या कार्यवाहीचा आढावा.

सदर कार्यक्रम बाबीवर चर्चा झाली मुद्या क्र.४ मधील "क " च्या बाबतीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील जास्तीत जास्त कर्मचारी जिल्हा परिषदेकडे पाठविण्याचे निर्देश देण्यात आले. मुद्या क्र.४ च्या "इ " मधील ३ चा बांधा, वापरा व हस्तांतरण करा या तत्वावरील बाबीवर चर्चा झाली असता, या कामासाठी सल्लागार नेमण्यात यावेत. त्याचप्रमाणे म.जी.प्रा.ची मोकळी जागा विकसीत केल्यानंतर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणालाही भाडयापोटी उत्पन्न मिळत राहील. अशी तरतूद करण्याचे निर्देशीत देण्यात आले. त्याच प्रमाणे "इ" मधील १ च्या बाबतीत महसुलात दर्शविण्यात आलेली रु. ३७.४१ कोटी या रक्कमेमध्ये ६ व्या वेतन आयोगापोटीची रु. १६.९० कोटीची तरतूद असली तरी ती कपातीचा विचार न करता गृहीत धरुनच ती भरुन काढण्याचा प्रयत्न करण्याचे निर्देश देण्यात आले.

बैठकीसमोर अन्य विषय नसल्याने उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर करण्यंत आले.

**मा. अध्यक्ष तथा**
**मंत्री, पा.पु. व स्व.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**